अनुसूचीत जाती उप योजने अंतर्गत अनुसूचीत जातीच्या कृषीपंप धारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देणे याकरिता महावितरण कंपनीस सहाय्य उपलब्ध करुन देणेबाबत (२०१८-१९)

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.पुर्नविनियोजन-२०१९/प्र.क.२०/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : -३० मार्च, २०१९

<u>संदर्भ</u> :- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. उविप्र-२०१८/प्र.क्र.३०/उर्जा-५ दिनांक ५.०५.२०१८
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९
३. महावितरण कंपनीचे पत्र क्र.मु.म.व्य. (सांघिक वित्त)/ १४५६, दि. १४.०३.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील (विदर्भ व मराठवाडयातील) मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज पुरवठा करण्याच्या योजनेस संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. व सदर योजनेचा लाभ राज्यातील अनुसूचीत जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना होण्याच्या दृष्टीने मागणी क्र. के-६, अनुसूचीत जाती उपयोजने अंतर्गत उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण (अजाउयो) (कार्यक्रम) (मुख्य लेखाशिर्ष २८०१५५५२) अंतर्गत फेब्रुवारी, २०१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये रु. १००० ची लाक्षणिक मागणी मंजूर करण्यात आली आहे. व सन २०१८-१९ च्या सुधारीत अंदाजात रु. ४७८ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

२. महावितरण कंपनीने त्यांच्या संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये रु. ४७८ कोटीची निधी वितरणाची मागणी केली आहे. परंतु संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये फक्त विदर्भ व मराठवाडयातील कृषीपंप धारकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने विदर्भ व मराठवाडा विभागातील कृषीपंप धारकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे अनुसूचित जातीच्या कृषीपंपधारकांच्या कृषीपंपाना वीज जोडणी देण्याकरिता रु. ३०३.१६ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. उपरोक्त प्रमाणे मंजूर झालेली रु. १००० ची लाक्षणिक मागणी विचारात घेता या विभागाच्या खालील योजनांच्या बचतीतून पुर्नविनियोजनाने रु. ३०३.१५९९ कोटी उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

<u>शासन निर्णय</u> :-

मागणी क्र. के-६, मुख्यलेखाशिर्ष २८०१५५५२ अनुसूचीत जाती उपयोजना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण या योजने अंतर्गत शासनाने सन २०१८-१९ करिता रु. ४७८ कोटी इतके सुधारीत अंदाज मंजूर केले आहेत. महावितरण कंपनीने त्यांच्या संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विदर्भ व मराठवाडयातील अनुसूचित जातीच्या कृषीपंपधारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता मागणी केल्यानुसार रु. ३०३.१५९९ कोटी इतका निधी खालील योजनांच्या बचतीतून पुर्नविनियोजन करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

(रु.कोटीत)

अनु.क्र.		मुख्यलेखाशिर्ष	सन २०१८-१९ ची मंजूर तरतूद (पुरवणी मागणीसह)	पुर्नविनियोजनाची रक्कम	पुर्नविनियोजना नंतरची सन २०१८-१९ ची तरतूद
१	२	३	४	५	६ (४-५)
१	घट करावयाचे लेखाशिर्ष	मागणी क्र. के-६ मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज ८०० इतर खर्च (००) (००) (०१) कृषी विषयक व यंत्रमाग विषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण / पारेषण परवाना धारकांना अर्थसहाय्य (२८०१२६१५)	७९४१.११	(-) १७५.११	७७६६.००
२	घट करावयाचे लेखाशिर्ष	मागणी क्र. के-६ २८०१ वीज (००) (०२) विदर्भ व मराठवाडा विभागातील कृषीपंपाना वीज जोडणी देणे (कार्यक्रम) (२८०१५५१६)	९००.००	(-) १२८.०४९९	७७१.९५०१
३	वाढ करावयाचे लेखाशिर्ष	मागणी क्र. के-६ मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज ७८९ अनुसूचीत जाती उप योजना (००) (००) (०१) उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण (अजाउयो) (कार्यक्रम) (२८०१५५५२)	०.०००१	(+) ३०३.१५९९	३०३.१६

३. मागणी क्र. के-६ मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज ७८९ अनुसूचीत जाती उप योजना (००) (००) (०१) उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण (अजाउयो) (कार्यक्रम) (२८०१५५५२) या योजने करिता मागणी क्र. के-६ मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज ८०० इतर खर्च (००) (००) (०१) कृषी विषयक व यंत्रमाग विषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण/पारेषण परवाना धारकांना अर्थसहाय्य (२८०१२६१५) या योजनेच्या बचतीतून रु. १७५.११ कोटी त्याचप्रमाणे मागणी क्र. के-६ २८०१ वीज (००) (०२) विदर्भ व मराठवाडा विभागातील कृषीपंपाना

वीज जोडणी देणे (कार्यक्रम) (२८०१५५१६) या योजनेच्या बचतीतून रु. १२८.०४९९ कोटी अशी एकूण रक्कम रु. ३०३.१५९९ कोटी पुर्नविनियोजनाने उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम भाग-२, दि. १७.०४.२०१५ चे परिशिष्ट वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग ३ अनु. क्र. १ परिच्छेद-१६२,१६३ व १६४ या मधील अट क्र. ९ मधील तरतूदीच्या अनुषंगाने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.९५/१९/व्यय-१६ दि. २८/३/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१९५६४२४२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.30 20:00:21 +05'30'

(नितिन गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१०) उप सचिव (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
११) कक्ष अधिकारी (रोखशाखा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
१२) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४) निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२